दिनांक ०४/०६/२०२२

## प्रेस नोट

**गणेश दिगंबरराव जाधव, वय ४० वर्षे, पद— तहसिलदार, वर्ग— १, नेमणुक— तहसिल कार्यालय, निलंगा, आ. क्र. २. रमेश गुंडेराव मोगरगे, वय ४२ वर्षे, व्यवसाय शेती, रा. शेंद, ता. निलंगा, जि. लातुर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक गणेश दिगंबरराव जाधव, तहसिलदार यांनी व खाजगी इसम रमेश मोगरगे यांनी तक्रारदार यांना वाळुच्या तीन ट्रक नियमितपणे चालवू देण्याकरीता व वाळुच्या ट्रकवर या पुढे कारवाई न करण्यासाठी आलोसे खाजगी इसम रमेश मोगरगे यांच्या मार्फतीने प्रति ट्रक ३०,०००/— रूपये प्रमाणे दोन ट्रक चे ६०,०००/— रू प्रति महा असे मागील तीन महिन्याचे १,८०,०००/— रू ची लाचेची मागणी केली बाबतची तक्रार दिनांक २५/०५/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि. २६/०५/२०२२, २८/०५/२०२२, ३०/०५/२०२२, ३१/०५/२०२२ दरम्यान लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांना आलोसे क्र १ यांनी व आ.क्र. २ यांनी मागील तीन महिन्याचे १,८०,०००/— रूपयाची लाच मागणी करून तडजोडी अंती १,५०,०००/— रूपये ठरवुन खाजगी इसम रमेश मोगरगे यांचेकडे देण्याबाबत सांगितले.

वरील प्रमाणे मागणी केलेली रक्कम १,५०,०००/— रू. आ.क्र. २ खाजगी इसम रमेश मोगरगे यांनी आज दि. ०४/०६/२०२२ रोजी १०.३३ वाजताच्या सुमारास तहसिलदार गणेश जाधव यांचे घरासमोर पंचासमक्ष स्विकारली म्हणून तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक व खाजगी इमस यांच्या विरुध्द पोलीस ठाणे निलंगा, जि. लातुर,येथे कलम ७, ७अ ला.प्र. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही मा.डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्री. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, सपोउपनि/ संजय पस्तापुरे, पोह/ रमाकांत चाटे, फारूख दामटे, भागवत कटारे, पोना/संतोष गिरी, पोकॉ/ शिवशंकर कच्छवे, आशिष क्षिरसागर, संदीप जाधव, दिपक कलवले, मंगेश कोंडरे, मपोकॉ/ रूपाली भोसले, पोकॉ/ गजानन जाधव, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक ९६२३९९९९४४ |
| २) | धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक ९९२३४१७०७६ |
| ३) | पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ४) | टोल फ्री | :— | १०६४ |
| ५) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :— | ०२४८२—२४२६७४ |
| ६) | Website | :— | www.acbmaharashtra.gov.in |
| ७) | Mobile App | :— | www.acbmaharashtra.net |
| 8) | Facebook Page | :— | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner